# भटका विमुक्त वडार समाज आणि संस्कृती

**विजयालक्ष्मी विजय देवगोजी**

लेखिका

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260009

## ABSTRACT:

हा शोधनिबंध वडार समाजाच्या संस्कृती आणि जीवनशैलीत ब्रिटिशांच्या राजवटीपासून ते स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या बदलांचे विश्लेषण करतो. १८७१ मध्ये 'गुन्हेगार जमात' म्हणून घोषित झालेला हा समाज १९५२ नंतर 'विमुक्त' झाला. पारंपरिक दगड-मातीच्या व्यवसायामुळे होणारी त्यांची भटकंती आता शिक्षण, औद्योगिकीकरण आणि सामाजिक चळवळींमुळे संपुष्टात येत आहे. वडार समाजाने शिक्षण घेऊन उच्च सरकारी पदे, साहित्य आणि चित्रपट क्षेत्रात यश मिळवले आहे. पारंपारिक पोषाख, विवाह पद्धती आणि खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत, तर जातपंचायत व्यवस्था आणि वडारबोली हळूहळू लोप पावत आहे. व्यसनाधीनता आणि पारंपरिक व्यवसायाचा ऱ्हास यांसारखी आव्हाने असूनही, वडार समाजाने मुख्य प्रवाहात येण्याची केलेली ही प्रगती संथ असली तरी लक्षणीय आहे, हे लेखात स्पष्ट होते.

## KEYWORDS:

वडार समाज, भटके विमुक्त, सामाजिक परिवर्तन, वडार संस्कृती, जातपंचायत.

### प्रस्तावना:

जातिव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये अगदी तळाशी असलेल्या भटक्या विमुक्त जाती-जमातींमध्ये वडार ही जात महाराष्ट्राच्या परिपत्रकाप्रमाणे भटक्या विमुक्त जमाती यादीमधील बाराव्या स्थानावर आहे. ओड, वड्डु, वड्डा, वड्डुर, वडार आदी नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या जमातीची ही नावे द्राविडीयन भाषेपासून तयार झालेली आहेत. यावरून या जमातीची नाळ नागवंशी द्रविडांशी जुळलेली आहे असे कळते. व्यवसायावरून या जातीच्या वेगवेगळया उपजाती किंवा पोटजाती आहेत आणि संपूर्ण भारतभर पसरलेल्या या उपजाती वेगळयावेगळया राज्यांत वेगवेगळया नावांनी ओळखल्या जातात, त्यापैकी ठळक जाती तीन प्रकारे आढळतात.

1. गाडी वडार किंवा बंडी वडार: जमिनीतून दगड काढणे, त्यांना आकार देणे, इमारती बांधणे इत्यादी व्यवसाय करणारे.
2. माती वडार: मातीचे काम करणे, खोदकाम करणे, तलाव बांधणे इत्यादी काम करणारे.
3. पाथरवट किंवा पाथरूट: पाटे, वरवंटे, मूर्ती बनविणे, मंदिरासाठी/वाड्यासाठी दगड बनवून बांधकाम करणे इ. काम करणारे.

पाषाण शिल्पकृती बनविणारा गावगाड्याच्या बाहेर राहूनही गावगाड्यांच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारा; पण गावगाड्यात स्थान न मिळालेल्या अशा या समाजात अत्यंत धीम्या गतीने का होईना सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय इ. प्रकारचे बदलाचे वारे वाहत आहेत आणि संपूर्ण समाजाच्या संस्कृतीमध्ये बदल घडत आहे. या बदललेल्या वडार संस्कृतीचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात येणार आहे.

## विषय विवेचन

### वडार समाजजीवनातील अनेक बदलांचा आढावा पुढील मुद्द्यांवरून तपासला जाणार आहे.

1. इंग्रजी राजवटीतील स्वातंत्र्यपूर्व काळ
2. स्वातंत्र्योत्तर काळातील
3. भटकंती
4. शैक्षणिक
5. पारंपरिक पोशाख
6. धार्मिक परंपरा व सणवार
7. अंधश्रद्धा
8. विवाह समारंभ
9. कुलगोत्र
10. एकत्र कुटुंब पद्धती
11. जातपंचायत
12. आडनाव
13. मोबाइल
14. खाण्या-पिण्याच्या सवयी
15. वडारबोली
16. वड्डुर शब्दबदल
17. स्त्रीजीवन
18. व्यसनाधीनता

19. सामाजिक चळवळी
20. पारंपरिक व्यवसाय
21. साहित्यिक

## १) इंग्रजी राजवट काळातील बदल

हिंदू धर्मातील मूळ क्षत्रिय असलेल्या या जमातीने ब्रिटिशांच्या सत्तासंघर्षात संस्थानिकांच्या बाजूने इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्याचा दृश्य परिणाम १८५७ च्या उठावात झाला, त्यामुळे आदिम जमाती धोकादायक ठरू शकतात, म्हणून सर्व भटक्या जमातींच्या बाबतीत १८७१ साली टी. व्ही. स्टीफन याने गुन्हेगार जमातीचा कायदा केला आणि मुक्तपणे वावरणाऱ्या वडार समाजाला गुन्हेगार ठरवून तीन तारांचे कुंपण असलेल्या सेटलमेंट जेलमध्ये बंदिस्त करण्यात आले.

## २. स्वातंत्र्योत्तर काळातील बदल

भारत स्वतंत्र झाल्यावर व घटनादत्त सरकार स्थापन झाल्यावर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहर नेहरू यांच्या पुढाकाराने हा कायदा १९५२ साली रद्द झाला. त्यानंतर २३ ऑगस्ट १९६० मध्ये सोलापुरात अधिवेशनासाठी आलेल्या पंडित नेहरू यांनी प्रतीकात्मकरीत्या कुंपण तोडून या गुन्हेगार जमातींना मुक्त केले. तेव्हापासून या जमाती 'विमुक्त' असे संबोधल्या जाऊ लागल्या आणि म्हणूनच वडार जमात 'विमुक्त' या गटामध्ये गणली गेली. महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांच्या यादीत ही जमात सध्या बाराव्या क्रमांकावर आहे.

## ३. भटकंती

पोटासाठी भटकत फिरणारी ही जमात विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून गावोगावी स्थिर होऊ लागली. पारंपरिक व्यवसायातील बदलामुळे या समाजाला शहरात व निमशहरात व्यवसायाच्या वेगवेगळया संधी प्राप्त झाल्यामुळे स्थिरता प्राप्त होऊ लागली. १९८४ मध्ये चंद्रशेखर भट यांनी आपल्या 'Ethnicity and mobility' या पुस्तकात वडार समाजाचा भटक्या स्वरूपापासून ते प्रस्थापित जीवनापर्यंतचा प्रवास तपासला आहे यासाठी त्यांनी सिद्धपूर या कर्नाटकातील गावात असलेल्या वडार समाजाची अभ्यासासाठी निवड केली.

### ४. शैक्षणिक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रणालीने वडार समाज हळूहळू शिक्षण घेऊ लागला आणि समाजात बदलाचे वारे वाहू लागले. बालाजी मंजुळेसारख्या काही व्यक्ती आय.ए.एस. झाल्या, तर नागराज मंजुळे यांनी चित्रपट व्यवसायात गगनभरारी घेतली. अनेक व्यक्ती अप्पर जिल्हाधिकारी, पोलिस अधिकारी, आरटीओ विभागप्रमुख, सोलापूर विद्यापीठातील विभागप्रमुख, महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक, तलाठी ते तहसीलदार, अशी अनेक पदे भूषविणे, महाविद्यालयातून अध्यापन, वैद्यकीय क्षेत्रामधील एमबीबीएसची पदवी मिळविणे, मासिके, पाक्षिके, दैनिके यांची प्रसारणे करणे, काही लेखकांच्या आत्मकथनाला राज्य पुरस्कार प्राप्त होणे, अशा प्रकारची भरारी घेतलेली आहे. पदवीधर होऊन समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अनेक उच्च पदांवर कार्यरत असणारी ही वडार मंडळी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक प्रयत्नांना आलेली समाजातील मधुर फळेच होत.

पूर्वी निरक्षर असणाऱ्या वडार समाजातील स्त्रिया सध्या शिक्षण घेऊन स्वाभिमानी बनलेल्या आढळून येतात. स्वाभिमान जागृत झाल्याने त्या नवऱ्याकडून होणारा अन्याय सहन करीत नाहीत. पूर्वीप्रमाणे मोलमजुरी न करता शिक्षण घेऊन नोकरी करताना आढळतात. दगडफोडी न करता उच्चभ्रू वस्तीमध्ये धुणीभांडी, स्वयंपाक, मुलांची देखभाल इत्यादी कामे करतात. आता तिसऱ्या पिढीतील महिला शिक्षण घेऊन प्राथमिक शिक्षिका, क्लार्क, अंगणवाडी सेविका, सामाजिक संस्था अशा ठिकाणी कार्यरत आहेत.

### ५. पारंपरिक पोशाख

पूर्वी या समाजातील पुरुष मंडळी धोतर, पायजमा व खांद्यावर उपरणे, असा पोशाख करून डोक्यावर रुमाल घेतात व अंगात कोयरी वापरत. पायात जोडे न घालता पायताण घालीत. स्त्रिया नऊवारी साडी नेसून पदर कायम डोक्यावर ठेवण्यासाठी पदराचे एक टोक दातात धरून ठेवत. कामाच्या ठिकाणी साडीचा कासोटा घालीत. अंधश्रद्धेपोटी त्या चोळी घालत नसत; पण आता यात बदल होऊन पुरुष शर्ट-पॅन्ट वापरतात आणि बूट वापरतात, तर स्त्रियांनी चोळी वापरायला सुरुवात

करून साडी-चोळी, पंजाबी ड्रेस असा पोशाख वापरायला सुरुवात केली आहे.

### ६. सणवार

या समाजातील लोक हिंदू धर्माप्रमाणे वर्षाचे बाराही महिने सण साजरे करतात. अनेक गावांत रथोत्सवात रथ ओढण्याचा मान या समाजातील लोकांना देण्याची परंपरा आहे. संक्रांत, होळी, रंगपंचमी, गुढीपाडवा, बेंदूर, नागपंचमी, रक्षाबंधन, दसरा, दिवाळी इत्यादी सण साजरे होतात. यात सध्या बदल होऊन इतर सणाबरोबरच सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू झालेली आहे. परंतु, यासाठी जवळजवळ शंभर वर्षांचा काळ मात्र जावा लागला.

### ७. अंधश्रद्धा

वडार समाजात अंधश्रद्धा टोकाची आहे. त्यामुळे याबाबतीत वडार समाजाने म्हणावा तितका बदल केलेला दिसत नाही. कुलदैवतांच्या जत्रेमध्ये देवतांना पशुबळी देण्याचा प्रकार होतो. सूंकलाम्मा, मसोबा, साती आसरा, दुर्गामाता, लक्ष्मीदेवी, अंगणलक्ष्मी, ईठलाई, यल्लमा इत्यादी देवांना भजले जाते. काळया लुगड्याच्या आईच्या जत्रेत गर्भिण बकरीचा बळी दिला जातो. हे सारे विधी कामाधंद्यात बरकत येण्यासाठी, आजार दूर करण्यासाठी केले जातात. विज्ञानाने अनेक शोध लावले, माणसाचे जीवन बदलले; पण वडार समाजातील या अंधश्रद्धा कमी होत नाहीत, हे मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल.

### ८. लग्नसमारंभ

पूर्वी या समाजात गरिबी होती, त्यामुळे मांडव, हॉल, वाजंत्री, दागिने, स्पीकर, हुंडा यांचा खर्च नसायचा. मात्र आता काळानुसार लग्न समारंभात श्रीमंत लोक श्रीमंतीचे प्रदर्शन करू लागले आहेत. पूर्वी तोंडी आमंत्रण देत; पण आता लग्नपत्रिका छापली जाते. पूर्वीप्रमाणे सात-सात दिवस लग्नविधी न होता 'झट मंगनी, पट शादी' होते. हुंडा देण्याची पद्धत नव्हती. परंतु, आता शिकलेली मुले रोख रक्कम, गाडी, दागिने यांची मागणी करतात. पूर्वीच्या काळी मुलीला 'द्याज' म्हणून रक्कम द्यावी लागे. ती प्रथा आता इतिहासजमा होऊन उलट मुलीकडून हुंडा घेतला जातो. त्याचप्रमाणे बालविवाहदेखील बंद झालेले आहेत.

## ९. कुलगोत्र

वडार समाजातील शिवगणात ३८ आणि गंगा गणात ३८ अशी एकूण ७६ गोत्रे आहेत. समाजाच्या नियमाप्रमाणे शिवगणातील मुलाला किंवा मुलीला त्याच गणातील मुला-मुलीबरोबर लग्न करता येत नाही. याला आता विज्ञानाचीही पुष्टी मिळाली आहे. त्यामुळे विवाह ठरविताना गोत्राची खात्री झाल्याशिवाय जातपंचायत लग्नाला मान्यता देत नसे; पण आता समाजाने भावी पिढीचा विचार करून त्याला प्रतिबंध घातला आहे. कुलगोत्राचा विचार न करता पुण्यातील माने आणि विटकर या दोन प्रतिष्ठित मंडळींनी थाटामाटात लग्न उरकून घेऊन एक नवीन पायंडा पाडून बदल घडवून आणला.

## १०. कुटुंब व्यवस्था

वडार समाज हा संयुक्त कुटुंब पद्धतीने जगणारा समाज होता. परंतु, आता आधुनिकीकरण व औद्योगीकरण यामुळे कुटुंबे विभक्त झालेली आहेत त्यामुळे या समाजातील संयुक्त कुटुंबपद्धती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

## ११. जातपंचायत

इतर भटक्या समाजाप्रमाणे या समाजाची जातपंचायत अस्तित्वात होती. मात्र, अलीकडील ५० वर्षांत बदलाचे वारे वाहून समाजातील मुख्य प्रवाहात या समाजाला प्रवेश मिळाला असल्यामुळे जातपंचायत नष्ट होऊन लोक आता कोर्टकचेरी व पोलिस स्टेशनची मदत घेताना आढळतात.

## १२. आडनावे

सुरुवातीच्या काळामध्ये स्थलांतरित झालेला आणि स्थानिक नागरी लोकांच्या संपर्कात आलेल्या वडार समाजातील लोकांना स्थानिक भागांमध्ये परिचित असणारी आडनावे स्वीकारण्याची गरज वाटू लागली. कारण, वडार समाजातील मूळ आडनावे स्थानिक लोक स्वीकारणार नाहीत, असे त्यांना वाटले. त्यामुळे स्थानिक मराठा समाजाची आडनावे स्वीकारण्यास सुरुवात केली. उदा. चव्हाण, चौगुले, पवार, शिंदे, जाधव, गायकवाड, मोहिते, थोरात इ. वडार समाजाच्या गोत्राशी पूर्णपणे विसंगत आहेत.

## १३. मोबाईल

वडार समाजात एखादा माणूस मयत झाला की, कित्येक दिवस ती बातमी कळायची नाही. परंतु, हल्ली मोबाईलमुळे कोणतीही चांगली-वाईट बातमी लगेच कळते. लग्नाचे आमंत्रणही हल्ली मोबाईलवर दिले जाते.

## १४. खाण्या-पिण्याच्या सवयी

वडार समाज पूर्ण मांसाहारी असून ते मास, मच्छी, अंडी खातात. गोमांस सोडून जवळपास सर्वप्रकारचा मांसाहार करतात. पूर्वीच्या काळी डुक्कर व उंदीर मारून खात. यात्रा, लग्न अशा कार्यक्रमाला बकरी मारून प्रसाद म्हणून खातात. जेव्हा हा समाज प्रस्थापितांच्या जवळ येऊ लागला, तेव्हा डुक्कर, उंदीर इत्यादी प्राणी खाल्ले, तर हा समाज आपल्याला सामावून न घेता दूर लोटेल या विचाराने डुक्कर व उंदीर खाणे या लोकांनी सोडून दिले. १९३० सालापासून कर्नाटकातील म्हैसूर येथे सामाजिक चळवळीतून हा बदल घडला आणि सर्वांत प्रथम तेथील वडार लोकांनी उंदीर खाणे बंद केले.

## १५. वडारबोली

वडार समाजाच्या बोलीला स्वतंत्र लिपी नसली, तरी या समाजाने आपले मौखिक लोक साहित्य टिकवून ठेवले आहे. बोलीचे स्वरूप व्यामिश्र असून, तेलगू भाषेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. भाषाशास्त्राच्या दृष्टीने ही बोली अतिशय महत्त्वाची आहे. परंतु, सध्या ही बोली नवशिक्षितांनी व्यवहारात न आणल्याने नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. विभक्त कुटुंबपद्धती, शहरीकरण, शाळा-कॉलेजमधील मुलांना भाषेविषयी वाटणारी लाज यामुळे वडारबोली हद्दपार होते आहे. मोठ्या पदावर काम करणारी माणसे वडारी भाषा बोलत नाहीत.

## १६. वड्डर शब्द

दावणगिरी येथे १९४४ मध्ये वडार जातीय संघटनेतर्फे संमेलन घेण्यात आले. त्यावेळी 'वडार' हा शब्द हीनपणा दाखविणारा व उच्चवर्णीयांकडून शिवीसाठी वापरला जाणारा शब्द होता, त्यामुळे अपमानित झालेले जातीविशेषनाम बदलण्यासाठी चर्चा झाली आणि वड्डरऐवजी 'भोवी' हे नाव देण्यात यावे, असा ठराव संमत केला गेला.

नंतर हा ठराव राज्य व केंद्र शासनाकडे पाठवून पाठपुरावा केला गेला, त्यामुळे नाव बदलायला मान्यता मिळाली.

### १७. स्त्रीजीवन

वडार समाजात जातपंचायतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान होते. तिला बोलण्याचा अधिकार नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळात दारुड्या नवऱ्याचा मार खात काबाडकष्ट करीत त्या जगत होत्या. आता एकविसाव्या शतकात शिक्षणाने वडार स्त्रीजीवनात बदल झालेला असून, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे. महाराष्ट्र शासन महिलांचे सबलीकरण करण्यासाठी राज्यात अनेक कल्याणकारी योजना राबवत आहेत. शिक्षण आणि नोकरीत आरक्षण आहे. त्याचा फायदा वडार स्त्रिया घेत असल्या, तरी राजकीय क्षेत्रात मात्र वडार महिलांची उणीव आहे.

### १८. व्यसनाधीनता

पूर्वी वडार समाजातील पुरुष मंडळी दारू पिऊन बायको-मुलांना मारहाण करीत शिवीगाळ करीत. समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी धडपडणारे हल्लीचे तरुण मात्र आता विदेशी दारू पीत असले, तरी मारहाण, शिवीगाळ मात्र करीत नाहीत. पूर्वी हातभट्टीची दारू पिणारा माणूस लगेच कळून यायचा. आता ते कळत नाही. तरुण, युवक पान-तंबाखू खाण्याऐवजी गुटखा, मावा इत्यादी खातात. दारू पिऊन अकाली मरण्याचे प्रमाण कमी झालेले आहे, त्यामुळे उपासमारीचेही प्रमाण कमी झाले आहे. मात्र, पूर्ण व्यसनाधीनता नष्ट झालेली नाही. स्त्रिया तंबाखू खात, दातवन लावीत, तपकीर ओढत, तंबाखूची मशेरी लावीत; पण आता तरुण महिलांमध्ये हळूहळू जागृती निर्माण होऊन व्यसनमुक्ती आंदोलनात त्या भाग घेत आहेत. कोल्हापूरजवळ टोप गावातील वडार महिलांनी दारूचे गुत्ते बंद व्हावेत म्हणून एकदा पुणे-बेंगलोर रस्त्यावर आंदोलनदेखील केले होते.

### १९. सामाजिक चळवळी

वडार समाजातील शिकलेल्या तरुणांनी समाजहितासाठी विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकापासून सामाजिक चळवळींना आरंभ केला. महाराष्ट्रातील वडार जमातीच्या चळवळीचे आद्यप्रणेते लक्ष्मण

महाराज धोत्रे यांनी मुलांसाठी शाळा काढल्या. समाजातील वारकऱ्यांसाठी मठ बांधला. मारुती मंदिर बांधले. वाचनालय, पतपेढी सुरू केली. त्याचप्रमाणे डॉ. लक्ष्मणराव देगलूरकर यांनी **'जय बजरंग, जय वडार'**चा नारा देऊन चळवळ सुरू केली. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, खानदेश, मराठवाडा, विदर्भ इत्यादी ठिकाणी वडार वस्त्यांना भेट देऊन कार्यकर्ते जमविले. वडार समाजाच्या या चळवळींचा विचार करता मुख्यतः त्या वांशिक ओळख, समाज बांधणी व राजकीय जाणीव यासाठी महत्त्वाच्या ठरल्या. महाराष्ट्र व कर्नाटक येथील संघटनांमुळे बेटी व्यवहार सुरू झाला. या चळवळींमुळेच वडार समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक परिवर्तनास सुरुवात झाली.

## २०. पारंपरिक व्यवसाय

खाणीतून दगड काढणे, हा वडार समाजाचा पारंपरिक व्यवसाय आता इतिहासजमा होत आहे. याचे कारण, आता कॉम्प्रेसर मशीन आल्याने एका तासात कित्येक दगड काढून होतात, त्याचप्रमाणे हल्ली पाटा-वरवंटा, उखळ, जाते यांचा उपयोग फारच कमी झाला आहे. मिक्सर, पीठगिरण्या, भातगिरण्या आल्यामुळे वडार लोकांचा पाटे-वरवंटे बनविण्याच्या कामावर गदा आलेली आहे. शेतातील नालाबंधाऱ्याची मातीची कामे वडार समाज करीत होता; पण आज यंत्रांमुळे बेकार झाला आहे. थोडक्यात, औद्योगिकीकरणामुळे व नव्या तंत्रज्ञानामुळे पारंपरिक साधने मागे पडल्याने वडार समाजाला इतर व्यवसायाकडे वळावे लागले आहे. बदलत्या काळानुसार छोटी-मोठी दुकाने, रिक्षा चालविणे, अर्धकुशल स्वरूपाची कामे करणे तसेच सेवा क्षेत्रात सुतारकाम, गवंडी, वेल्डर, फिटर इत्यादी कामांकडे ते वळले आहेत. वडार समाजातील तिसऱ्या पिढी मात्र आता माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेली असून, चतुर्थश्रेणीच्या शासकीय नोकऱ्यांमध्ये ती कार्यरत आहे. मोजकेच स्त्री-पुरुष डॉक्टर, वकील, इंजिनिअर, प्राध्यापक या क्षेत्रांत काम करताना आढळतात. परंतु, बांधकाम व्यवसायात मात्र यशस्वी झाल्याचे दृश्य आढळून येते.

## २१. साहित्यिक

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक जाती-जमातींतील लोक अल्पप्रमाणात का होईना आपल्याविषयी, आपल्या समाजाविषयी लिहू लागले, ते

पाहून वडार समाजानेही आपले जगणे, आपल्यावरील अत्याचार, समाजातील नायक, वीर पुरुष यांची माहिती व आपली संस्कृती इतरांना कळावी म्हणून आत्मकथने व इतर साहित्यनिर्मिती करण्यास सुरुवात केली. या मंडळींनी वडार समाजाचा इतिहास, संस्कृती, परंपरा, स्थिती आणि गती व समाजशास्त्रीय अभ्यास करून ग्रंथसंपदा निर्माण केलेली आहे.

## समारोप

पोटासाठी भटकंती करून वेगवेगळया ठिकाणी स्थलांतर करणारा वडार समाज आता स्थिर होत आहे. त्याचबरोबरच शिक्षणामुळे विचारात, आचारात व खाण्या-पिण्याच्या पद्धतीत बदल करीत आहे. अंधश्रद्धा काही प्रमाणात कमी झाल्या असून, समाजातील अनेकांनी चळवळी उभ्या केल्या आणि अंधश्रद्धेमुळे येणाऱ्या क्लेशदायक गोष्टींना [illegible] दिली. चोळीच्या क्रांतिकारी लढ्यामुळे वडार स्त्री अब्रूने जगू लागली. व्यसनाधीनता कमी होऊ लागली. थोड्याफार प्रमाणात का होईना वडार समाज मुख्य प्रवाहाबरोबर चालू लागलेला आहे. स्त्रियांच्या खडतर आयुष्यात बदल झाला. शिक्षणामुळे स्त्री-पुरुषांना वैचारिकता प्राप्त झाली. वडार समाजाचे साहित्य लिहिले गेले. परंतु, ही प्रगती अगदीच धीम्या गतीने होत आहे. वडार समाजाची सर्वांगीण प्रगती जलदगतीने होण्यासाठी शासनाने व समाजातील शिक्षित आणि विचारवंत व्यक्तींनी आणखी ठोस उपाय करणे गरजेचे आहे.

## संदर्भ:


1. 'वळंबा' शिवमूर्ती भांडेकर, भूमी प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ५ सप्टेंबर २००७.
2. 'वडार समाज: इतिहास आणि संस्कृती', भीमराव चव्हाण, स्वाभिमान प्रकाशन, प्रथम आवृत्ती २००७.
3. 'वडार गर्जना' प्रथम वर्धापनदिन विशेषांक २००७, संपादक : बाबासाहेब धोत्रे.
4. 'वडार समाज आणि संस्कृती', सतीश पवार, ओड्र सेवा संस्था, दुसरी आवृत्ती, मार्च, २०१०.
5. 'वडारगाडा', रामचंद्र नलावडे, देशमुख आणि कंपनी प्रा.लि. प्रथम आवृत्ती, डिसेंबर, २०११.
6. 'आंतरजाल': पगला गजोधर, ६ ऑक्टोबर, २०१४.
7. 'वडार समाज: स्थिती आणि गती', प्रवर्तन पब्लिकेशन लातूर, संपादक, श्रीकांत मुद्दे, प्रथम आवृत्ती १ मे, २०१४.
8. 'वडार समाज: समाजशास्त्रीय अभ्यास', विनायक लष्कर, हरिती प्रकाशन, प्रथम आवृत्ती जानेवारी, २०१५.
9. 'वडार समाज: परंपरा व इतिहास', टी. एस. चव्हाण, प्रकाशक, सचिन चव्हाण, प्रथम आवृत्ती २५ डिसेंबर, २०१६.
10. 'युगशिल्पी', प्रा. शिवमूर्ती भांडेकर, मुक्तरंग प्रकाशन, दुसरी आवृत्ती १ जुलै, २०१९.


**Funding:**
This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**
The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**
© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.